# महसूल प्रशासनाकडून पारनेर तालुका ‘टार्गेट’!




**पारनेर दर्शन**




वर्ष १ अंक २२८, रविवार २६ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# सुप्यात अतिक्रमणाविरोधात मोठी कारवाई

## ■ नगर-पुणे महामार्ग, सुपा-पारनेर रस्ता व एमआयडीसीतील शेकडो अतिक्रमणे हटविली ■ सुप्याला पोलीसांच्या छावणीचे स्वरूप ■ धार्मिक स्थळेही हटविण्याच्या भूमिकेमुळे संताप

सुपा : शरद रसाळ

**लोकसभा निवडणूकीची धामधूम संपते ना संपते तोच निवडणूकीच्या निकालापूर्वीच महसूल प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून सुप्यातील शेकडो अतिक्रमणे शनिवारी मोठया पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आली. सुपा-पारनेर रस्ता, एमआयडीसी तसेच नगर-पुणे महामार्गावर ही कारवाई करण्यात आली. शेकडो वर्षे जुनी धार्मिक स्थळेही हटविण्याची भूमिका प्रशासनाने घेतल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**

सुप्यातील अतिक्रमणे हटविण्यासंदर्भात प्रशासनाने अतिक्रमण धारकांना यापूर्वीच नोटीस बजावल्या होत्या. अतिक्रमणधारकांनी स्वतः अतिक्रमणे काढून घेण्याबाबत नोटीसच्या माध्यमातून बजावण्यात आले होते. मात्र बहुतांश अतिक्रमणधारकांनी अतिक्रमणे न काढल्याने शनिवारी सुप्यात शेकडोंच्या संख्येने आलेल्या पथकाने सकाळी आठ वाजताच कारवाई सुरू केली. मोठा पोलीस बंदोबस्त असल्याने या पथकास कोणीही विरोध केला नाही.

अतिक्रमण विरोधी कारवाई करण्याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. शनिवारी सकाळी मोठा फौजफाटा बसस्थानक चौकात दाखल झाल्यानंतर अतिक्रमणधारकांमध्ये एकच तारांबळ उडाली. सुपा-पारनेर रस्त्यावरील फळांची दुकाने, चहा सेंटर, चप्पल दुकाणे, कापड दुकाणे, मटन शॉप, पान टपऱ्यांसह बाजारतळ परिसरातील विविध अतिक्रमणे, सुपा हाईटसचे कंपाउंड, पुढे याच रस्त्यावरील एमआयडीसी चौकापर्यंतची अतिक्रमणे जेसीबी, क्रेनच्या मदतीने हटविण्यात आली. अतिक्रमणे हटविताना अतिक्रमणधारकांचे प्रचंड नुकसान झाले.





■ सुप्यातील विविध ठिकाणची अतिक्रमणे महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकाने काढून टाकली.

### बेकरी हबला तडाखा

हार आणि बेकरी उत्पादनासाठी प्रसिध्द असलेल्या सुप्यातील बेकरी हबलाही या अतिक्रमणविरोधी पथकाने तडाखा दिला. त्यामुळे नगर-पुणे महामार्गावरील नेहमी वाहतूकीची कोंडी होणारी सुप्यातील बेकरी हब परीसर अतिक्रमण मुक्त झाला आहे. सायंकाळी उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती.

### लंके समर्थकांकडून विखे-पिता पुत्रांवर टीकेची झोड

अतिक्रमण मोहिम राबविण्यास सुरूवात झाल्यानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे तसेच खा. डॉ. सुजय विखे यांच्यावर मा. आ. नीलेश लंके समर्थकांकडून सोशल मीडियावर दिवसभर टीकेची झोड उठविण्यात येत होती. अतिक्रमण काढतानाचे व्हिडीओ शेअर करून सुजय पर्व आले हे विखे यांच्या निवडणूकीतील गाणे त्यासोबत जोडण्यात आले होते.





(सर्व छायाचित्रे : समीर शेख, सुपा)

### कायदेशीर बाबींची पुर्तता करून अतिक्रमणे हटविली

अतिक्रमणामुळे वाहतूकीच्या समस्येबरोबच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याचा नागरीकांना त्रास होता होता. मागील तीन महिन्यांपासून महसूल विभाग व सार्वजनिक बांधकाम खात्याचा महामार्ग विभाग ही अतिक्रमणे काढण्यासाठी प्रयत्नशिल होते. संबंधितांना नोटीस देत कायदेशीर बाबी पुर्ण करून ही अतिक्रमणे काढण्यात येत आहेत. गरज पडल्यास रविवारीही ही मोहीम राबविण्यात येईल.

गणेश राठोड, प्रांताधिकारी
पारनेर-नगर भाग

### प्रचंड बंदोबस्त

अतिक्रमणे काढण्याऱ्या पथकाला विरोध होऊ नये यासाठी प्रचंड मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. २ पोलिस उपाधिक्षक, ७ पोलीस निरीक्षक, तात्काळ दंगल नियंत्रण पथक, राज्य राखीव पोलीस दलाचे पथक, १०० पोलीस कर्मचाऱ्यांचा त्यात समावेश होता. त्यामुळे अतिक्रमण परिसरात पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

### सुपा-पारनेर रस्त्याने घेतला मोकळा श्वास

सुपा बस स्थानक चौक ते पारनेर रस्त्यावर मोठया प्रमाणावर अतिक्रमणे झाली होती. रस्त्यावर दुकाने आल्याने वाहतूकीची नेहमीच कोंडी होत होती. बुधवारी बाजारच्या दिवशी वाहनचालकांना त्याचा मोठया प्रमाणात त्रास होत होता. चोऱ्यांचे प्रमाणही वाढले होते. सर्व अतिक्रमणांवर हातोडा पडल्याने या रस्त्याने मोकळा श्वास घेतला.

### शाबूसिंह पवारांचे समाधीस्थळ हटविण्यासाठी नोटीस

शेकडो वर्षापूर्वी ज्या शाबूसिंह पवार यांनी सुपा गावाची स्थापना केली त्यांचे शेकडो वर्षापूर्वीची सुपा-पारनेर रस्त्यावरील समाधीस्थळ हटविण्याबाबतही नोटीस बजावण्यात आली आहे. शाबूसिंह पवार यांच्या वंशजांनी मात्र या निर्णयास तिव्र विरोध केला आहे. हे समाधीस्थळ हटविण्यासाठी नोटीस काढण्यात आली असली तरी ती आम्हास प्राप्तही झाली नसल्याचे शाबूसिंह पवार यांचे १२ वे वंशज संग्रामसिंह पवार यांनी सांगितले. अलिकडेच या समाधीस्थळाचा आठ लाख रूपये खर्चून जिर्णोध्दार करण्यात आला असून गायत्रीराजे पवार या समाधीस्थळाची देखभाल करीत आहेत. शेकडो वर्षापूर्वीचे आमच्या वंशजांचे समाधीस्थळ आम्ही हटवू देणार नाही. असे संग्रामसिंह पवार यांनी सांगितले.

### महसूलकडून पारनेर तालुका टार्गेट

सुप्यातील अतिक्रमणे हटविण्यापूर्वी महसूल विभागाकडून तालुक्यातील स्टोन क्रशर मालकांना नोटीस बजाण्यात येउन ते सिल करण्यात आले आहेत. कोटयावधींची दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली आहे. यापूर्वीही स्टोनक्रशर धारकांवर कारवाई करण्यात आली होती. अनेकांनी आगाऊ रॉयल्टी जमा केलेली असतानाही त्यांचे स्टोन क्रशर सिल करण्यात आले आहे. स्टोन क्रशर पाठोपाठ अतिक्रमण विरोधी मोठी कारवाई करण्यात आल्याने महसूल विभागाने पारनेर तालुका टार्गेट केल्याची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, पारनेर तालुका टार्गेट केला जात असताना इतर तालुक्यांमध्ये मात्र अशा कारवाया करण्यात आल्या नसल्याने राजकीय सुड भावनेतून या कारवाया करण्यात आल्याची कुजबूज सुरू आहे.

### शादवलबाबा दर्गा हटविण्यासही विरोध

सुमारे ४०० वर्षापुर्वीच्या सुपा-पारनेर रस्त्यावरील शादवलबाबा दर्गा हटविण्याचाही अट्टहास अतिक्रमणविरोधी पथकातील अधिकाऱ्यांनी लावून धरला होता. रस्त्याच्या मध्यापासून १५ मिटर अतिक्रमणे काढली जात असताना हा दर्गा २५ मिटर दुर हटवा अशी भूमिका अधिकारी घेत होते. हे पथक दर्ग्याजवळ पोहचले त्यावेळी तिथे हिंदू-मुस्लिम बांधव मोठया संख्येने जमा झाले होते. पुरातन देवस्थान असल्याचे ते हटविले जाऊ नये अशी त्यांची मागणी होती. दर्ग्याभोवतीचे कंपाउंड दोन्ही समाजाच्या बांधवांनी काढून घेतले मात्र दर्गाच हटवा अशी भूमिका अधिकाऱ्यांनी घेतली. अखेर शेजारच्या शेतकऱ्याने जागा देण्याची तयारी दर्शविल्याने शेकडो वर्षापूर्वीचा दर्गाही हालविण्यास पथकाने भाग पाडले.

### एमआयडीसीने सरसकट अतिक्रमणे हटविली

प्रशासनाकडून अतिक्रमणधारकांना नोटीस देण्यात आल्यानंतर काही अतिक्रमणधारकांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयापुढे बांधकाम विभाग व औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने त्यांच्या वकीलांनी बाजू मांडली. ३० तारखेपर्यंत या कारवाईस स्थगिती देण्यात यावी अशी मागणी करण्यात आल्यानंतर दोन्ही वकीलांनी त्यास संमती दिली. न्यायालयात गेलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे हटविण्यात आली नाहीत. मात्र औद्योगिक वसाहत प्रशासनाने ३० तारखेचा आदेश धुडकावत सरसकट अतिक्रमणे दुर केली.

### नगरमध्ये बैठक ?

या कारवाईसंदर्भात महसूल अधिकाऱ्यांची नगरमध्ये एका राजकीय व्यक्तीसोबत आचारसंहिता असतानाही बैठक झाल्याची माहीती पुढे आली आहे. या बैठकीत सुप्यातील अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. अशी बैठक झाल्याबाबत एका अधिकाऱ्याने दुजोराही दिला.

### पदाधिकाऱ्याच्या भाषणाचा व्हिडीओ व्हायरल

लोकसभा निवडणूकीच्या प्रचारादरम्यान भाजपाच्या एका पदाधिकाऱ्याने सुपा-हंगा येथे झालेल्या अतिक्रमणाचा मुद्दा आपल्या भाषणात आक्रमकपणे मांडून अतिक्रमणांवर कारवाईची मागणी केली होती. निवडणूकीसाठी मतदान झाल्यानंतर ही कारवाई तातडीने झाल्याने त्या पदाधिकाऱ्याच्या भाषणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

### मळगंगा देवीचे मंदिरही हटविले

शहांजापुर चौकात गेल्या पन्नास वर्षांपासून असलेले मळगंगा देवीचे मंदिरही अतिक्रमण विरोधी पथकाकडून सोडण्यात आले नाही. मंदिर अतिक्रमणात असल्याचे कारण पुढे करून हे मंदिरही जमीनदोस्त करण्यात आले. त्यामुळे मळगंगा देवी भाविकांमध्ये नाराजी पसरली.

### धनदांडग्यांना अभय नको

महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या कारवाईमध्ये गोरगरीबांचे मोठे नुकसान झाले आहे. शेकडो कुटूंबे त्यामुळे बाधित झाली असून ही कारवाई करताना धनदांडग्यांना, राजाश्रय असलेल्यांना अभय देण्यात येऊ नये अशी अपेक्षा अतिक्रमणधारकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### महामार्गावरील अतिक्रमणांवरही कारवाई

नगर-पुणे महामार्गावरील सुपा बसस्थानक चौक ते मुंजोबा हॉटेल दरम्यान मोठया प्रमाणावर अतिक्रमणे झाली होती. बेकरी, हारांची दुकाने या भागात असून ग्राहकांची वाहने थांबल्याने या परीसरात नेहमीच वाहतूकीची कोंडी होते. या भागातील अतिक्रमणेही काढण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

### राजकीय दबावातून कारवाई

अतिक्रमणविरोधी पथकाने आमचे काहीही ऐकूण घेतले नाही. त्यांनी केलेल्या कारवाईत आमच्या दुकानाचे प्रचंड नुकसान झाले. राजकीय सुड भावनेतून ही कारवाई करण्यात आली असून प्रशासनातील अधिकारीही आमच्यावर प्रचंड दबाव असल्याचे सांगत आहे. शेकडो वर्षापासूनचा सुपा-पारनेर रस्त्यावरील दर्गाही हटविण्याचा घाट घातला गेला आहे. गोरगरीबांच्या पोटावर पाय देउन प्रशासनाने काय मिळविले ?

अल्ताब शेख
अतिक्रमणधारक व्यावसायिक






# प्रगतीमंत्र

## MPSC च्या राज्यसेवा पूर्वपरीक्षेची सुधारित तारीख

**राज्य लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीमार्फत घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा पूर्वपरीक्षेची सुधारित तारीख जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित परीक्षा ६ जुलै रोजी घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर एसईबीसी प्रवर्गातून अर्ज भरण्याची संधी उमेदवारांना दिल्याचे एमपीएससीने स्पष्ट केले आहे.**



महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्वपरीक्षा २०२४ करिता दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजी एकूण २७४ रिक्त पदांकरिता जाहिरात प्रसिद्ध केली असून, जाहिरातीनुसार संबंधित परीक्षा २८ एप्रिल २०२४ रोजी घेण्याचे नियोजित होते. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४, २६ फेब्रुवारी २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरिता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षणाची तरतूद केली आहे. प्रस्तुतप्रकरणी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षणनिश्चिती करून सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाला कळविण्यात आले. त्यानुसार आयोगाच्या २१ मार्च २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे जाहीर केले होते. आता परीक्षा सुधारित दिनांकाला म्हणजेच शनिवारी (६ जुलै २०२४) आयोजित करण्यात येईल. शासनाकडून प्राप्त सुधारित मागणीपत्रानुसार महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्वपरीक्षा २०२४ परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील एकूण ५२४ पदांचा सुधारित तपशील एमपीएससीमार्फत जाहीर केला असून, अर्ज भरण्याचे वेळापत्रकदेखील जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



## CBSE बोर्डाचा निकाल यंदा प्रथमच डिजिलॉकरवर...

**केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई बोर्डाच्या दहावी, बारावीच्या परीक्षा संपून जवळपास दोन महिने उलटले आहेत. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना निकालाचे वेध लागले आहे. त्यातच सीबीएसईने यंदा प्रथमच डिजिलॉकर ॲप आणि वेबसाइट https://www.digilocker.gov.in/ वर दहावी-बारावीचा निकाल पाहता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यासाठी डिजिलॉकरवर खाते असणे गरजेचे असल्याचे सांगितले आहे.**

सीबीएसईकडून निकालाची अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही, परंतु २० मेनंतर निकाल जाहीर करण्यात येणार आहे. निकाल हा मंडळाच्या अधिकृत वेबसाइट https://www.cbse.gov.in/ वर जाहीर करण्यात येणार आहे. डिजिलॉकरवरही पाहता येणार आहे. मागील वर्षी सीबीएसईने दहावी-बारावीचा निकाल मे महिन्यातच जाहीर केला होता. सीबीएसईच्या दहावी-बारावीच्या परीक्षेमध्ये यंदा सुमारे ३९ लाख विद्यार्थी बसले होते. यापैकी २१ लाख ८६ हजार ९४० विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेसाठी, तर १६ लाख ९६ हजार ७७० विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. हे सर्व विद्यार्थी आता निकाल लागण्याची वाट पाहत आहेत.



### असे उघडा खाते

प्रथम डिजिलॉकरच्या अधिकृत वेबसाइट https://www.digilocker.gov.in/ वर जावे. त्यानंतर विद्यार्थ्यांना दहावी-बारावीचा वर्ग निवडावा लागेल. विद्यार्थ्यांना शाळेचा कोड, रोल नंबर आणि ६ अंकी प्रवेश कोड टाकावा लागेल. मोबाईल नंबर, जन्मतारीख आणि अन्य तपशील भरावा लागेल. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना निकाल थेट डिजिलॉकरच्या खात्यावर मिळेल. वेबसाइटप्रमाणे डिजिलॉकर ॲपवर या पद्धतीने खाते उघडता येईल. त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून ॲप डाउनलोड करून घ्यावे लागेल.



## तंत्रशिक्षण विद्यार्थ्यांना एक्झिटचा पर्याय



**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न वास्तुशास्त्र आणि अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबवणाऱ्या संस्थांमध्ये प्रथम वर्ष उत्तीर्ण केलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रम सोडण्याचा पर्याय देण्यात आला आहे. त्यासाठी राज्य मंडळाकडून येत्या २० जूनपर्यंत लिंक उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. महेंद्र चितलांगे यांनी स्पष्ट केले आहे.**

डॉ. चितलांगे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून के. स्किमअंतर्गत पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुधारित करून प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम राबविण्यास सुरू केला आहे. सध्या व्दितीय वर्षांचा अभ्यासक्रम तयार करण्याचे कार्य सुरू आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने इच्छुक विद्यार्थ्यांना मल्टिपल एंट्री आणि मल्टिपल एक्झिटची तरतूद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मंडळाशी संलग्न वास्तुशास्त्र व अभियांत्रिकी मंडळाशी संलग्न वास्तुशास्त्र व अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व पदविका संस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तयार करीत असलेल्या के. स्किमच्या अभ्यासक्रमात जे विद्यार्थी प्रथम वर्षानंतर पदविका अभ्यासक्रम सोडू इच्छितात अशा विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष उत्तीर्ण केल्यानंतर लर्निंग असेसमेंट स्किम फॉर वन इयर एक्झिट कोर्स लागू राहील. विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष उत्तीर्ण करणे आणि ४ आठवड्यांची आंतरवासिता पूर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सोडत असलेल्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून सर्टिफिकेट ऑफ व्होकेशन प्रदान करण्यात येईल.

मंडळाच्या संकेतस्थळावर लर्निंग असेसमेंट स्किम फॉर वन इयर एक्झिट कोर्सची लिंक २० जून २०२४ पर्यंत उपलब्ध करून देण्यात येईल. याबाबत सर्व प्राचार्य, संस्थाप्रमुख यांनी शासन निर्णयाचा सखोल अभ्यास करून सविस्तरपणे संस्थेतील सर्व विभागप्रमुख तसेच अधिव्याख्याता यांना याबाबत पूर्णपणे माहिती द्यावी. तसेच विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक प्रशिक्षणाबाबत औद्योगिक क्षेत्र ठरविण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची असेल यांची नोंद घेण्यात यावी, असे स्पष्ट केले आहे.

## आरआयएमसी परीक्षा आता ८ जूनला

### परीक्षेचे सुधारित वेळापत्रक

- परीक्षेची तारीख : ८ जून
- गणित : सकाळी ९.३० ते ११ (२०० गुण)
- सामान्यज्ञान : दुपारी १२ ते १ (७५ गुण)
- इंग्रजी : दुपारी २.३० ते ४.३० (१२५ गुण)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (उत्तराखंड) प्रवेश पात्रता परीक्षा अर्थात आरआयएमसी परीक्षा १ जूनऐवजी ८ जूनला घेण्यात येणार आहे. त्यासाठीचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे. ओक यांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (उत्तराखंड) प्रवेशपात्रता परीक्षा १ जूनला घेण्यात येणार होती, परंतु राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेजच्या कमांडंट यांनी दिलेल्या सूचनेनुसार १ जूनला ८ राज्यांमध्ये लोकसभा निवडणूक असल्याने संबंधित परीक्षा १ जून ऐवजी ८ जूनला घेण्यात येणार आहे.

## विमान वाहतूक उद्योगात करिअर

**काही दिवसांपूर्वी आयसीएसई बोर्डाचा दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर करण्यात आला. लवकरच, सीबीएसई आणि महाराष्ट्र बोर्डाच्या परीक्षांचा निकाल जाहीर केला जाईल. त्यामुळे, बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर किंवा बारावीच्या निकालाची वाट पाहत असणाऱ्यांसाठी करिअरच्या दृष्टीने एक महत्त्वाची माहिती देत आहोत. तुम्ही तुमच्या करिअरच्या पर्यायाचा विचार करत असाल तर, तुम्ही विमान वाहतूक क्षेत्रात करिअर करू शकता. माहितीच्या अभावामुळे, फार कमी लोक विमान वाहतूक उद्योगात करिअर करण्याचा विचार करतात. तुम्ही पायलट बनू शकता आणि आकाशात उंच उडू शकता. या जॉब प्रोफाइलवर तुम्ही दरमहा लाखो रुपये कमवू शकता. जर तुम्ही या क्षेत्रात तुमचे करिअर वेळेवर केले तर तुमची वाढ लवकर होऊ शकते. याशिवाय सरकारी आणि खाजगी दोन्ही क्षेत्रात नोकरीच्या भरपूर संधी आहेत...**

### पगारही उत्तम...

वायुसेना अधिकाऱ्याचा पगार ५६ हजार १०० रुपयांपासून सुरू होतो. त्याच वेळी, व्यावसायिक पायलट म्हणून, तुम्ही दरमहा १ ते दीड लाख रुपये कमवू शकता. अनुभवानुसार तुमच्या कमाईतही वाढ होते.

### या आहेत आवश्यक पात्रता...

- जर एखादा विद्यार्थी या क्षेत्रात जाण्याचा विचार करत असेल तर त्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांसह किमान ५० टक्के गुणांसह १२वी उत्तीर्ण केलेली असावी. यानंतर, तुम्हाला कोणत्याही एव्हिएशन इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घ्यायचा असल्यास, तुम्हाला प्रवेश परीक्षा, वैद्यकीय चाचणी आणि मुलाखत उत्तीर्ण करावी लागेल. एव्हिएशन इन्स्टिट्यूटमध्ये तुम्हाला विमानांशी संबंधित सर्व प्रशिक्षण दिले जाते. यासोबतच त्याच्या उड्डाण आणि देखभालीचे संपूर्ण प्रशिक्षण दिले जाते.
- भारतीय हवाई दलात पायलट होऊन तुम्हीही देशाच्या सेवेत योगदान देऊ शकता. यासाठी, १२ वीनंतर तुम्हाला UPSC NDA परीक्षा, एअर फोर्स कॉमन ॲडमिशन टेस्ट (AFCAT), NCC स्पेशल एंट्री स्कीम परीक्षा यापैकी कोणत्याही एका परीक्षेला बसून ही परीक्षा पास व्हावी लागते. यामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना भारतीय हवाई दल प्रशिक्षण देते. भारतीय हवाई दलात पायलटची नोकरी मिळविण्यासाठी, एखाद्याला संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा द्यावी लागते.

### कमर्शियल पायलट हा कामाचा वेगळा पर्याय...

एव्हिएशन इन्स्टिट्यूटमधून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, तुम्ही व्यावसायिक पायलट म्हणून तुमचे करिअर सुरू करू शकता. कमर्शिअल पायलट लायसन्स (CPL) साठी, तुम्हाला फिटनेस टेस्ट आणि लेखी परीक्षा द्यावी लागेल, जी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्हाला व्यावसायिक पायलट परवाना मिळतो.

### मेडिकलला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गूड न्यूज

## पदव्युत्तर पदवी वैद्यकीय प्रवेशाच्या जागा वाढल्या...

**राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग अर्थात एनएमसीने २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी नवीन पदव्युत्तर पदवी वैद्यकीय अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आणि पदव्युत्तर पदवीच्या जागा वाढवण्यासाठी १५३ अर्ज मंजूर केले आहेत. त्यामुळे ११० महाविद्यालयांमध्ये नवीन पीजी वैद्यकीय अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत, तर ४३ महाविद्यालयांमध्ये पीजी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागा वाढणार असल्याचे एनएमसीने स्पष्ट केले आहे.**



सध्या देशात एमबीबीएसच्या १ लाख ८ हजार ९९० जागा आहेत, तर पीजीच्या ६९ हजार ६९४ जागा आहेत. गेल्या महिन्यात आयोगाच्या वैद्यकीय मूल्यांकन आणि मानांकन मंडळाने १०१ अर्ज मंजूर केले होते. आता बहुतांश वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पीजी अभ्यासक्रमही सुरू करता येणार आहेत. एमएस जनरल सर्जरी, एमएस-ईएनटी, एमएस सायकियाट्री, एमडी कम्युनिटी मेडिसिन, एमडी पॅथॉलॉजी, एमडी रेडिओ डायग्नोसिस, एमडी नेस्थेसियोलॉजी यासह अभ्यासक्रमांच्या जागांमध्ये वाढ होणार आहे. २०२८-२९ पर्यंत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या जागांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवण्याच्या योजनेवर काम केले जात आहे.

२०१३-१४ मध्ये देशात ३८७ वैद्यकीय महाविद्यालये होती, ती आता ७०६ झाली आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांची संख्याही वाढत आहे. एमबीबीएस केल्यानंतर पीजीच्या जागा वाढविण्यावर विशेष लक्ष दिले जात जेणेकरून आहे. विद्यार्थ्यांना देशात पीजीसाठी अधिक संधी मिळतील. देशातील पीजी मेडिकल कॉलेजमध्ये नीट पीजी परीक्षेच्या आधारे प्रवेश दिला जातो, तर एमबीबीएस इत्यादी पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये नीट यूजीच्या आधारे प्रवेश दिला जातो. केंद्रीय आणि राज्य कोट्यासाठी नीट यूजी समुपदेशन स्वतंत्रपणे आयोजित केले जाते. केंद्रीय कोटा समुपदेशन पूर्ण झाल्यानंतरच राज्य कोटा समुपदेशन होते. वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या जागांचा टक्का वाढल्यामुळे प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

## विधी पाच वर्षे सीईटी ३० मे रोजी

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलने नुकतेच काही सीईटी परीक्षांचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले होते. त्यामध्ये विधी पाच वर्षे सीईटी परीक्षा २२ मे रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु आता पुन्हा सीईटी सेलने संबंधित परीक्षेची सुधारीत तारीख जाहीर करत परीक्षा ३० मे रोजी घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी सीईटी सेलमार्फत विधी पाच वर्षे या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा राज्यातील तसेच राज्याबाहेरील विविध परीक्षा केंद्रांवर २२ मे रोजी घेण्यात येणार होती. परंतु सीईटीची २०२४ ची कायदेविषयक चाचणी परीक्षा आणि विधी ५ वर्षे सीईटी परीक्षा एकाच दिवशी येत असल्याने अनेक उमेदवारांनी सीईटी सेलला विधी पाच वर्षे सीईटी परीक्षेची तारीख बदल करण्याची विनंती केली. त्यामुळे विधी पाच वर्षे सीईटी परीक्षेची तारीख आता २२ मे ऐवजी ३० मे करण्याचा निर्णय सीईटी सेलच्या वतीने घेण्यात आला आहे. संबंधित परीक्षा प्रवेशपत्राबाबत उमेदवारांना ई-मेल आणि एसएमएसद्वारे कळवण्यात येईल.



## शॉर्ट न्यूज

### साईबाबा पालखी समिती अध्यक्षपदी रमेश भोसले

■ **शिर्डी :** गेली ३५ वर्षे पुण्यातील श्रीसाईबाबा पालखी समितीच्यावतीने पुणे ते शिर्डी पदयात्रेने साई पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी गुरूपौर्णिमेला हजारो भाविक या माध्यमातून शिर्डीला पायी येत असतात. या श्रीसाईबाबा पालखी समितीच्या अध्यक्षपदी रमेश भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीत कार्याध्यक्षपदी किरण कदम, सचिव मंदार शहाणे, खजिनदार महावीर क्षीरसागर यांची नियुक्ती झाली आहे. याशिवाय विश्वस्त मंडळात गुरूप्रसाद पगडे, गोकुळ राहुरकर, विजय मेथे, संजय खरोटे, अरुण वीर यांचा समावेश आहे.

### कंटेनरची चाके व डिझेल चोरुन नेले

■ **राहुरी :** सतिष पोपट चव्हाण, रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी. यांच्याकडे एम एच १७ सीव्ही १०६० हा कंटेनर आहे. त्यावर आबासाहेब विलास गाडे, रा. मोमीन आखाडा, ता. राहुरी हा चालक आहे. चालक विलास गाडे याने रात्रीच्या दरम्यान सदर कंटेनर राहुरी फॅक्टरी येथील संख्येश्वर पेट्रोलपंपावर लावला होता. अज्ञात चोरट्यांनी कंटेनरचे ४ डिस्क, ४ टायर तसेच ४५० लिटर डिझेल असा एकूण १ लाख ८२ हजार रुपए किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला. सतिष पोपट चव्हाण यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### हॉटेलमधून मद्यांच्या बाटल्यांची चोरी

■ **संगमनेर :** शहरालगत गुंजाळवाडी शिवारातील हॉटेल सम्राट फोडून चोरट्यांनी सुमारे १. ४२ लाख रूपयांच्या विदेशी कंपनीच्या मद्याच्या बाटल्यांचे बॉक्स चोरले. चोरीची घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली. पोलिसांनी एका संशयितास ताब्यात घेतले. गुंजाळवाडी शिवारात कालडा पांचे सम्राट बिअर बार अँड परमिट रूम आहे. चोरट्यांनी किचनचा दरवाजा तोडून आत पवेश केला. हॉटेलमधील ६८, ८०० रूपये किमतीचे विदेशी मद्याचे खंबे, ८८ हजारांचे विदेशी दारूचे ५ बॉक्स, ८, ५२० रुपयांच्या बियरच्या बाटल्या व २० हजार रुपये असा मुद्देमाल लंपास केला.

### सोनसाखळी चोरी करणाऱ्यांना अटक

■ **नगर :** शहरात सोनसाखळी चोरी करणाऱ्या दोन गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. त्यांच्या ताब्यातून एक लाख ७५ हजार रूपये किमतीचे २५ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे. सलीम ऊर्फ सलीमोद्दीन अजोलोद्दीन शेख, जिशान सलीम ऊर्फ सलीमोद्दीन शेख अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. २९ एप्रिल रोजी गीता मुकूंद देशमुख या रस्त्याने पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या एका चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १० ग्रॅमचे सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने ओरबडून नेले होते.

### प्रा. निकाळे यांना पीएच. डी

■ **राहाता :** नगरपरिषदेतील निवृत्त कर्मचारी नानासाहेब राणुजी निकाळे यांचे चिरंजीव प्रा. अमोल नानासाहेब निकाळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन विषयातील पीएच. डी. पदवी जाहीर झाली आहे. प्रा. निकाळे यांनी अ कंपरेटीव्ह स्टडी ऑफ एच. आर. डी. प्रॅक्टिस ऑफ एलआयसी अँड ऑदर प्रायव्हेट लाईफ इन्शुरन्स कंपनीज या विषयावर विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केला.

# कल्याणीनगर अपघातानंतर प्रशासनाला जाग

## ३२ पब, बार, रुफटॉपवर कारवाईचा बडगा



**पुणे : प्रतिनिधी**

**अल्पवयीन मुलांना मद्य विक्री करणे, रात्री दीडनंतरही बार सुरू ठेवणे, बेकायदा मद्यसाठा करणे अशा विविध कारणांसाठी शहरातील ३२ पब, रुफटॉप हॉटेल्स आणि बारवर उत्पादन शुल्क विभागाने कारवाईचा बडगा उगारून ते सील केले आहेत. यामध्ये चौदा पबचा समावेश असून कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर खडबडून जागे झालेल्या उत्पादन शुल्क यंत्रणेने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ही कारवाई केली आहे.**

कल्याणीनगर येथे अल्पवयीन मुलाने आलिशान कार भरधाव वेगाने चालवून दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुण-तरुणीचा मृत्यू झाला. तत्पूर्वी, या अल्पवयीन मुलाने त्याच्या मित्रांसोबत मुंढव्यातील दोन पबमध्ये पार्टी केली होती. या मुलाच्या वयाची खातरजमा न करता त्याला मद्य पुरविल्याप्रकरणी पोलिसांनी संबंधित पबचा मालक, व्यवस्थापक, बार काउंटर व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत ठेवले आहे. या अपघातानंतर शहरातील पब, बारमध्ये सुरू असलेले गैरप्रकार उघड झाल्याने सरकारी यंत्रणांवर चहूबाजूने टीकेची झोड उठली.

त्या पार्श्वभूमीवर उत्पादन शुल्क विभागाने नियमबाह्य पद्धतीने पब, बार चालविणाऱ्यांवर कारवाईचा धडाका सुरू केला आहे. उत्पादन शुल्क विभागाचे पुणे अधिक्षक चरणसिंह रजपूत आणि उप अधिक्षक सुजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चौदा पथके तयार केली आहेत. या पथकांमार्फत पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात पब, बार, रेस्तराँकडून नियमांचे पालन होते की नाही, याच्या तपासणीसाठी धडक मोहीम राबविण्यात येत आहे. गेल्या तीन दिवसांत पब, रुफटॉप हॉटेल्स व बार अशा ३२ परवानाधारकांवर विविध नियमांचा भंग केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये सोळा पबसह, दहा रुफटॉप हॉटेल्स आणि सहा बारवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

याशिवाय एप्रिल महिन्यापासून ५४ परवानाधारकांवर गुन्हे नोंदवून पाच लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. त्यापैकी एकूण ३२ परवानाधारक पब, बार, हॉटेल्स-रेस्टॉरंट सील करण्यात आले आहेत. याबाबतचा अहवाल उत्पादन शुल्क विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला असून, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी या सर्व ३२ परवानाधारक पब, बार आणि रुफटॉप हॉटेलचे व्यवहार तत्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

# उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे साईबनमध्ये गर्दी!

## बच्चे कंपनी लुटतात विविध खेळाचा आनंद



**नगर : प्रतिनिधी**

**मुलांना उन्हाळ्याची सुट्टी लागली मात्र लोकसभेच्या निवडणुकीत पालक वर्ग अडकून पडला जशी निवडणूक संपली तशी लोक फिरायला बाहेर पडले त्यामुळे साईबन मध्ये सध्या रोज गर्दी वाढत आहे.**

सध्या उष्णतेचा पारा ४० अंशापुढे गेल्याने सध्या एक दिवसीय सहली साठी थंडगार व मोठ्या प्रमाणात झाडी व तलाव असलेल्या नगरमधील शिर्डी रोडवरील नागापूर एम.आय.डी.सी.च्या मागे असणार्या साईबन कृषी पर्यटन केंद्रात अनेक जण सहकुटुंब व ग्रुपने येत आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

शहराजवळ कापूरवाडी, पिंपळगाव माळवी,बारदरी येथील तलावातील पाणी कमी होत आहे.मात्र साईबन मधील तलावात मोठ्या प्रमणात पाणी आहे व बोटींगची सोय आहे त्यामुळे नगरकरांना अगदी जवळ बोटिंगचा आनंदही मिळत आहे.

नगर शहराच्या जवळ तशी पण कोठे बोटींगची सोय नाही.नगरमध्ये येणारे पाहुणे,पर्यटक एक दिवसासाठी साईबनमध्ये भेट देतात व बोटींग बरोबर इतरही खेळाचा आनंद घेतात. साईबन मध्ये पपेट शो आणि गाडी हे एक विशेष आकर्षण आहे. डोनाल्ड डक,मिकी माउस,व अलिबाबाची गुहा आणि उंच उंच टेकड्या,त्याच्या बाजूने जाणाऱ्या रेल्वे गाडीचा कर्कश आवाज आणि मोहित करणारे परिसरातील संगीत,जुन्या नव्या गाण्यांची रेलचेल हे सर्व आकर्षित करणारे आहेत. महाराष्ट्रातील अनेक पर्यटक व परिवार मोठ्या संख्येने साईबानला येत आहेत निसर्गरम्य असणारे वातावरण तसेच झाडी व शुद्ध हवा यामुळे मन प्रसन्न राहते.नगर बरोबरच सर्व महाराष्ट्र तसेच शनि शिंगणापूर,शिर्डी येथून येणारे भाविक येथे भेट देतात.

# पालकमंत्री म्हणून माझे बारकाईने लक्ष

■ अखेर अजित पवार पुण्यात दाखल

■ पोर्शे हिट अँड रन प्रकरणी वक्तव्य

**पुणे : प्रतिनिधी**

**अग्रवाल प्रकरणात जामीन कोणत्या पद्धतीने मिळाला हे पाहिले आहे, त्यामुळे कडक भूमिका घेतली असून या प्रकरणात पारदर्शक ठेवली आहे. पालकमंत्री म्हणून माझे बारकाईने लक्ष घातले असल्याचे अजित पवार यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. पुण्यातील हिट अँड रन प्रकरण देशभर चर्चेत असताना पुण्याचे पालकमंत्री कुठे आहेत? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. या प्रकरणी सुप्रिया सुळे यांनीही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.**

या बाबत माध्यमांशी बोलताना अजित पवार यांनी माझ्याबाबतीत गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न होत असल्याचे म्हटले आहे. पुण्यामध्ये व्यावसायिक विशाल अग्रवालच्या अल्पवयीन मुलाने कल्याणीनगरमध्ये दोघांना चिरडल्यानंतर अजित पवार काहीच बोलले नाही. या प्रकरणाची चर्चा राज्यातच नाही तर देशभरात होत होती. तरी देखील अजित पवार कुठेच दिसले नाही. त्यामुळे त्यांच्याबाबत राजकीय चर्चांना उधाण आले होते. त्यामुळे शुक्रवारी पहिल्यांदाच पुण्यामध्ये अजित पवार आल्यानंतर त्यांनी पुण्यातील घटनाक्रमावर भूमिका स्पष्ट केली आहे.



मी माध्यमांसमोर नसलो तरी या प्रकरणावर माझे बारीक लक्ष होते, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. मी मीडीयासमोर येत नसलो तरी माझे काम सुरू होते. पोलिस आयुक्त आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी आपण चर्चा केली असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले. पुण्यामध्ये अनधिकृत संस्कृती वाढत असल्याचेही अजित पवार यांनी म्हटले आहे. तसेच या संदर्भात कारवाई देखील सुरू करण्यात आली असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

**आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी**

राज्यात दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी करणारे पत्र मुख्य सचिवांनी निवडणूक आयोगाला पाठवले असल्याची माहिती अजित पवार यांनी या वेळी दिली. शेतकऱ्यांना बी बियाणे, खते मिळण्यासाठी देखील आपले लक्ष असल्याची माहिती अजित पवार यांनी म्हटले आहे.

# घारगावात अवैध मुरूम वाहतूक शासनाचा लाखोंचा कर बुडाला

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदे तालुक्यातील घारगाव येथील रानमाळ शिवारात ३ ते ४ पोकलेन मशीन व १० ते १२ हायवा यांच्या साह्याने रात्र न् दिवस मुरूम उत्खनन सुरू आहे. थोड्या ब्रासची रॉयल्टी भरून कोट्यवधी रुपयांच्या मुरमाचे उत्खनन राजरोसपणे सुरू आहे.**

हजारो ब्रास मुरूम उचलून अनधिकृतपणे त्याची वाहतूक केली जात आहे. महसूल अधिकारी-कर्मचारी राजकिय दबावापोटी त्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. घारगाव येथील रानमाळ शिवारात ३ ते ४ पोकलेन मशीन व १० ते १२ हायवा यांच्या साह्याने दिवसरात्र मुरूम उत्खनन केली जात आहे. येथून खुलेआम हजारो ब्रास मुरमाची वाहतूक केली जाते.

रानमाळ येथे कडूलिंब, बाभळीची मोठमोठी झाडे मशीनच्या साह्याने काढून टाकली आहेत. नाममात्र रॉयल्टी भरून कागदे काळे करून राजकीय नेत्याच्या दबावापोटी कागदी घोडे नाचवून हा प्रकार सुरू आहे. मात्र, त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून, त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. घारगाव येथील रानमाळावरून अवैध मुरूम वाहतूक केली जात आहे. कारवाईबाबत सूचना घारगाव येथील अवैध मुरुम उत्खननप्रकरणी लक्ष घालून पुढील कारवाईच्या सूचना कामगार तलाठ्यांना दिल्या आहेत. कामगार तलाठ्यांकडून अहवाल येताच पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहिती तहसीलदार डॉ. क्षितिजा वाघमारे यांनी दिली.

ADMISSIONS
OPEN 2024-25
प्रवेश सुरू
२०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

● प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राउंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# मळगंगा ट्रस्ट निवडणूक, छानणीत सर्व अर्ज मंजूर

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्तपदाच्या निवडीसाठी दाखल झालेले सर्व ८७ अर्ज छानणीत मंजुर झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रभाकरशेठ कवाद व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी महेश ढवळे यांनी दिली.**

सकाळी अर्जांची छानणी झाल्यानंतर दुपारी एक वाजता वैध उमेदवारी अर्जांची यादी प्रसिध्द करण्यात आली. या विश्वस्त संस्थेचे १ हजार २१४ सदस्य असून त्यापैकी १ हजार १८१ सभासद मतदानास पात्र आहेत. दि. २७ मे पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत असून दि. २ जुन रोजी दुपारी चार वाजेपर्यंत मतदान घेण्यात येऊन त्यानंतर लगेच मतमोजणी करून निकाल जाहिर करण्यात येणार आहे. खबरदारीचा उपाय म्हणून मतदानाच्या दिवशी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असली तरी अजूनही ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी ज्येष्ठ मंडळी तसेच काही युवक प्रयत्नशिल आहेत.









### ज्यांचे योगदान, त्यांना संधी हवी

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद, उपाध्यक्ष शांताराम लंके, कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके तसेच २१ विश्वस्तांपैकी १० ते ११विश्वस्तांचे अनेक वर्षांपासून ट्रस्टसाठी योगदान असून त्यांना कायम ठेऊन दहा युवकांना विश्वस्त म्हणून संधी द्यावी असा मतप्रवाह विशेषतः युवक वर्गाचा आहे.**

### बिनविरोधसाठी १५ लाखांची देणगी

**ट्रस्टची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वच प्रयत्नशिल आहेत. त्यासाठी ट्रस्टचे कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके यांनी शुक्रवारी १२ लाख रूपयांची देणगी जाहिर केली आहे. शनिवारी डी. बी.लाळगे कन्स्ट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष तथा विद्यमान विश्वस्त दत्तात्रय लाळगे, कन्हैय्या उद्योग समुहाचे संस्थापक शांताराम लंके प्रत्येकी १ लाख रूपये देणगी देण्याचे जाहिर केले आहे. पुढे शिवाजी मारूती लामखडे ५१ हजार, हौसाबाई बाबुराव बोंडवे यांच्या तर्फे विकास बोंडवे ५१ हजार रूपयांची देणगी देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे देणगीची रक्कम १५ लाखांपर्यंत पोहचली आहे. येत्या एक दोन दिवसांत देणगीमध्ये आणखी भर पडेल असे सांगितले जात आहे.**

### कोणाला संधी, कोणाची माघार ?

**एकीकडे बिनविरोध निवडीचा आग्रह धरला जात असताना अर्ज दाखल करण्यात आलेल्या ८७ उमेदवारांपैकी कोण अर्ज मागे घेणार व कोणाचे नाव कायम राहणार याची उत्कंठा शिगेला पोहचली आहे.**

### ज्येष्ठांना संधी देण्याची मागणी

**गेल्या चाळीस बेचाळीस वर्षात प्रभाकरशेठ कवाद, शांताराम लंके, ज्ञानदेव लंके यांचे ट्रस्टसाठी योगदान आहे. त्यांना विश्वस्त मंडळात संधी मिळावी अशी बहुसंख्य गावकऱ्यांची इच्छा आहे. कवाद, लंके यांनी ट्रस्टमध्ये काम करताना निःस्वार्थीपणे व पारदर्शक कारभार करून विकास कामांचा पाठपुरावा केला आहे.निघोज व परिसरातील विकास कामे, मळगंगा देवीचा यात्रोत्सव, जगप्रसिध्द रांजणखळगे, कुंड परिसरातील विकास कामे तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत कामे सुरू आहेत. लोकसहभागातूनही लाखो रूपयांची कामे करण्यात येत असून या तिघांसह सात ते आठ ज्येष्ठांना संधी मिळावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

# दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी

## संकेतस्थळावर पाहता येणार ऑनलाईन निकाल

पुणे : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल येत्या सोमवारी (ता. २७) दुपारी एक वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रकटनाद्वारे दिली आहे.**

राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे.

दहावीच्या परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील आणि सदर माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल.



मंडळाच्या https://mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालासोबत निकालाबाबतची इतर सांख्यिकी माहिती उपलब्ध होईल. तसेच mahahsscboard.in या संकेतस्थळावर शाळांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

निकाल पाहण्यासाठी अधिकृत संकेतस्थळे पुढीलप्रमाणे :

- https://mahresult.nic.in
- http://sscresult.mkcl.org
- https://sscresult.mahahsscboard.in
- https://results.digilocker.gov.in

# शिवीगाळ, मारहाण करणाराविरोधात कारवाई नाही

## जनार्दन वाजे पोलीस अधीक्षक कार्यालयापुढे उपोषण करणार

निघोज : प्रतिनिधी




**शेताच्या बांदावरील झाडे काढण्यास विरोध केल्याने मारहाण करणारांविरोधात फिर्याद देउनही कारवाई न झाल्याने पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा वडनेर बुद्रुक येथील किसन वाजे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.**

वाजे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयास दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वडनेर परिसरात वाजे यांची शेतजमीन असून शेतीच्या बांधावर त्यांच्या मालकीची झाडे आहेत. ही झाडे काढण्यासाठी जेसीबी मालक गणेश रसाळ हे आल्यानंतर वाजे यांनी ही झाडे आपल्या मालकीची असून ती काढण्यास मनाई केली. त्याचा राग येउन संभजी शिवाजी थोरात, बाबाजी सखाराम थोरात, अरूण बाबाजी थोरात यांनी घरी येत अर्वाच्च भाषेत शिवागाळ करीत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. मारहाणीनंतर जीवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचे वाजे यांचे म्हणणे आहे.

मारहाणीनंतर वाजे यांनी निघोज दुरक्षेत्र येथे जाउन आरोपींविरोधात फिर्याद दाखल केली मात्र पोलीस प्रशासनाकडून आरोपींविरोधात काहीही कारवाई केली नसल्याचे वाजे यांचे म्हणणे आहे. फिर्याद देऊन दोन आठवडे झाले तरी आरोपी राजरोसपणे फिरत असून ते दहशतीचे वातावरण निर्माण करीत आहेत. पोलीसांकडे जा मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांकडे जा आमचे कोणी वाकडे करू शकणार नाही अशी दमदाटी करण्यात येत असल्याचेही वाजे यांनी निवेदनात नमुद केले आहे.

या आरोपींविरोधात काय कारवाई केली याची चौकशी पोलीसांकडे करण्यात आली असता चौकशी सुरू आहे असे साचेबंद उत्तर देण्यात येते. पोलीस आणि अरोपी यांचे संगणमत असल्याचा संशय व्यक्त करून न्याय मिळविण्यासाठी आपण पोलीस अधीक्षक कार्यालयापुढे उपोषणास बसणार असल्याचे वाजे यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# पारनेर तालुक्याला ३५ टँकरने पाणीपुरवठा

## जिल्ह्यातील सव्वासहा लाख जनता तहानलेली

पारनेर : प्रतिनिधी




**नगर जिल्ह्यात दिवसेंदिवस टंचाईच्या झळा वाढत आहे. तहानलेल्या लोकांना पाणीपुरवठा करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. सध्या जिल्ह्यात ३३३ टँकरने ३१८ गावे व १६९८ वाडी-वस्तीवरील सहा लाख २४ हजार ६२४ लोकांना पाणीपुरवठा सुरू आहे. दरम्यान तालुक्यात ३५ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.**

ग्रामीण भागात पाण्याचे उद्भव कोरडे पडू लागल्याने दिवसेंदिवस टँकरच्या मागणीत वाढ होत आहे. आज अखेर जिल्ह्यात ३३३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सर्वाधिक टँकर पाथर्डी तालुक्यात सुरू आहे. पाथर्डी, कर्जत, पारनेर, श्रीगोंदे व शेवगाव या पाच नगरपालिकेत २७ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. याशिवाय जिल्ह्यात सध्या संगमनेर तालुक्यात २७ टँकर, अकोले ६, कोपरगाव ४, नेवासे ५, पारनेर ३५, नगर ३३, पाथर्डी १०१, शेवगाव १२, कर्जत ४५, जामखेड २६, श्रीगोंदे ११, अशा एकूण ३३३ टँकरने जिल्ह्यात पाणीपुरवठा सुरू आहे.

# आपण जगायचं कसं हे महापुरुष आपल्याला सांगतात

## शिवव्याख्याते सचिन भोजने यांचे प्रतिपादन

चोंभूत : प्रतिनिधी



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाची घटना लिहिताना छ. शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यातील कार्यपद्धती लक्षात घेऊन त्याकाळातील प्रशासन डोळ्यासमोर ठेऊन महाराजांचा आदर्श घेतला तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानले. त्यांच्या शिक्षणाचा वसा अंगी बाळगून स्वतः उच्च शिक्षण घेतले व जगातील सर्वोत्तम महापुरुष बनले. त्यांचा आदर्श आपल्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तींनी घेतला पाहिजे. कारण आपण जगायचं कसं हे महापुरुष आपल्याला सांगत असतात. डॉ. बाबासाहेब हे संघर्षातून घडलेले आहेत म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा व स्वतःला घडवावे असा मोलाचा संदेश स्वप्नवेध अनाथालयाचे संस्थापक तथा शिवव्याख्याते सचिन भोजने यांनी चोंभूत (गौतमनगर )येथील आयोजित संयुक्त जयंती महोत्सव प्रसंगी बोलताना दिला.ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.**

कार्यक्रम प्रसंगी जेष्ठ पत्रकार पांडुरंग म्हस्के, अमोल गुंजाळ (पो. उपनिरीक्षक ),दत्तात्रय कोल्हे (चेअरमन ), राजू भालेराव,दत्तात्रय म्हस्के, खंडू म्हस्के, नवीन सोनवणे,अजय सोनवणे,मान्यवर उपस्थित होते

चोंभूत येथील नीलक्रांती मित्र मंडळ व माता रमाई महिला मंडळ आयोजित एक दिवसीय महापुरुषांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी पंचक्रोशीतील भिमबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळ सत्रात बौद्ध पूजा पाठ व धम्मवंदना तसेच पंचशील ध्वज ध्वजारोहन लोकनियुक्त सरपंच कांचन दत्तात्रय म्हस्के यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यानंतर संध्याकाळी महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

मिरवणूकीतील खास वैशिष्ट्य म्हणजे स्वप्नवेध अनाथालयातील बालचमुंनी लाठी फिरवणे, अग्नीलाठी च्या कसरती करून दाखवल्या व उपस्थितांची मने जिंकली. मिरवणूक नंतर काही वक्त्यांची भाषणे झाली यात प्रमुख वक्ते शिवव्याख्याते यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला व प्रसिद्ध लेखक हरी नरके यांच्या पुस्तकातील काही दाखले सांगितले व शेवटी लहान मुलांना व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नीलक्रांती तरूण मित्र मंडळाचे अध्यक्ष नितीन भालेराव,संतोष भालेराव,डॉ. प्रवीण भालेराव, प्रा. संजय भालेराव, संगम भालेराव,बाबासाहेब गुंजाळ,मंगेश भालेराव,संकेत भालेराव,अविनाश भालेराव व माता रमाई महिला मंडळ यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोपट भालेराव (सर )यांनी केले तर आभार राघू गुंजाळ यांनी मानले.

# कडक उन्हाळ्यात साईबन मधील झिपलाईन सफर ठरली पर्यटकांची आकर्षण

## नगरकर लुटतात झिपलाईनचा आनंद



नगर: प्रतिनिधी

**दोन डोंगर किंवा नदी पार करण्यासाठी वापर केली जाणारी व मोजक्या पर्यटनस्थळी असणारी झिपलाईन सफर साईबन कृषी पर्यटन केंद्रामध्ये असून सध्या असणारे कडक उष्णता मानामध्ये तलावातील पाण्यावरून जाताना पर्यटकांचे ती खास आकर्षण ठरली आहे साईबन मधील तलाव पार करणारी झिपलाईन सफर जिल्हात प्रथम ४ वर्षांपूर्वी सुरु झाली व तिचा आनंद हजारो जणांनी घेतला आहे.**

साईबनमधील टेकडीवरून तलाव पार करण्यासाठी झिपलाइन बनविण्यात आलेली आहे.या लाइनवरून पर्यटक तलाव पार करून दुसऱ्या टोकाला असलेल्या किनाऱ्यावर जातात.वेगाने हा प्रवास होतो. त्यासाठी नैसर्गिक उतार वापरण्यात आला असून सुमारे ५०० किलो वजन पेलण्याची त्यामध्ये क्षमता आहे.ज्यावेळी पर्यटक डोंगरावरून झिप लाइनने निघतात त्यावेळी आपण हवेत तरंगत आहोत असे वाटते सर्व परिसर सुंदर दिसतो.

खाली दिसणाऱ्या बोटी,तलावाचा कारंजाच्या तुषार अंगावर घेत पर्यटक दुसऱ्या ठिकाणी पोहचतो,नगरकर तर खास या ठिकाणी येत आहेत व झिपलाईनचा आनंद घेत आहे.सध्याच्या दिवसात या जिपलाइन वरून असंख्य लोक आनंद घेत आहे यामध्ये लहानापासून ते वयोवृद्धपर्यत सर्वजण आहेत,संपूर्ण सुरेक्षेसह हि सुमारे २५ मीटर झिप लाईन आहे,यामध्ये बसल्याशिवाय आनंद काय असतो हे समजणार नाही.

नगरचे प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश व डॉ. सुधा कांकरिया यांनी २५ वर्षांपूर्वी नगर-शिर्डी रस्त्यावर औद्योगिक वसाहतीच्या पाठीमागे १५० एकरांच्या माळरानावर हिरव्यागार वनराईचे स्वप्न पाहिले आणि ते साकारण्यास सुरूवात केली.याकरिता त्यांनी आंबा, चिंच,कडुनिंब,निलगिरी,बाभूळ, साग, बांबू,बोर,आवळा,सीताफळ,करवंद अशा झाडांची लागवड केली.औद्योगिक प्रकल्पाचे वाया जाणारे सांडपाणी मोठ्या कुशलतेने ठिबक सिंचनाचा वापर करून झाडांना दिले आणि पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब अडविला. यातून लोकांनी प्रेरणा घ्यावी यासाठी त्यांनी कृषी पर्यटन सुरु केले आहे.

# विजेच्या खेळखंडोब्यामुळे पारनेरकर हैराण

## ■ कर्मचाऱ्यांना चोरटा फॉल्ट सापडेना पाच तासात दहावेळा वीज पुरवठा खंडित ■ शनिवारी दिवसभर वीज बंद

पारनेर : प्रतिनिधी

**विजेच्या खेळखंडोब्यामुळे पारनेरचे ग्रामस्थ हैराण झाले आहेत.आज शुक्रवारी (२४ मे) दुपारी १२ ते संध्याकाळी ५ या कालावधीत तब्बल १० वेळा वीज पुरवठा खंडित झाला.उष्णतेच्या तडाख्यात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांच्या हालाला पारावार राहिला नाही. दरम्यान पारनेर -सुपे दरम्यानच्या विद्युत वाहिनीच्या दुरुस्तीसाठी शनिवारी (२५ मे ) पारनेचा वीज पुरवठा दिवसभर खंडित राहणार असल्याचे सहायक अभियंता अजय बासनीवाल यांनी सांगितले.**

बासनीवाल म्हणाले की, सुपे ते पारनेर दरम्यानच्या वीज वाहक तारांना झाडाच्या फांद्या घासत असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे.वीज वाहिनी कर्मचारी नेमका बिघाड कुठे आहे ते शोधत आहेत.मात्र फांद्या नेमक्या कुठे घासतात हे लक्षात येत नाही. (वीज अधिकारी, कर्मचारी अशा न सापडणाऱ्या बिघाडाला चोरटा फॉल्ट म्हणतात.) बिघाड सापडल्यावर वीज पुरवठा सुरळीत होईल असे बासनीवाल म्हणाले.



अवकाळी पाऊस,वादळी वाऱ्यामुळे वीज वाहक तारा तुटणे, झाडाच्या फांद्या वीज वाहक तारांना घासणे, खांबावरील चिनी मातीच्या चिमण्या उन्हामुळे तडकून फुटणे यामुळे वीज वाहक तारांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याचे बासनीवाल यांनी सांगितले.

### एप्रिल,मे महिन्यात होणारा अवकाळी

**पाऊस,वादळी वाऱ्याची शक्यता गृहीत धरून मार्च महिन्यात विद्युत वाहिन्यांची दुरूस्ती का केली जात नाही असे विचारले असता सहायक अभियंता अजय बासनीवाल यांनी थकबाकी वसुलीचे कारण दिले.मार्च महिना थकबाकी वसूल करण्यात जातो त्यामुळे देखभाल दुरूस्तीला वेळ मिळत नसल्याचे बासनीवाल यांनी सांगितले. यासंदर्भात उपकार्यकारी अभियंता श्रीरंग हटावकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी देखभाल दुरुस्ती विषयी बोलणे टाळले.बैठकीत असल्याचे कारण देत एक तासाने माहिती देतो असे सांगितले मात्र पुन्हा संपर्क केला नाही.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com